**<u>एम.ए.(एन.आर.जे.ई.) नं.०१/२०१८ मधील निशाणी ०१ वरील आदेश</u>**

१. प्रस्तूत अर्ज अर्जदारानी त्यांना आर.जे.ई.कमांक २४०/२०१७ मध्ये दिलेल्या त्यांच्या वडीलांच्या वारसा प्रमाणपत्रामध्ये मृत्युची तारीख १०.०९.२०१६ ऐवजी दिनांक १०.०५.२०१६ अशी दुरूस्ती करून वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचा अर्ज थोडक्यात खालीलप्रमाणे.

अर्जदाराचे वडील दिनांक १०.०५.२०१६ रोजी मयत झाल्याचे मा.दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, नांदेड यांनी जाहिर केले होते. परंतु अनावधाने दिनांक १०.०५.२०१६ ऐवजी त्या निकालामध्ये दिनांक १०.०९.२०१६ हि तारीख झाली होती आणि अर्जदाराने त्याच निकालावर सन्मानीय न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज कमांक २४०/२०१७ दाखल केला होता. तो अर्ज या न्यायालयाने मंजुर करून अर्जदारांच्या वडीलांचे मृत्यु दिनांक १०.०९.२०१६ असा नमुद करून वारस प्रमाणपत्र दिले होते. परंतु वारस प्रमाणपत्र मिळाल्यानंतर अर्जदाराच्या त्यांच्या वडीलांच्या मृत्युची तारीख चुकल्याची लक्षात आले. त्यामुळे त्यांनी मा.दिवाणी न्यायालय, व.स्तर नांदेड येथे अर्ज करून त्या न्यायालयाच्या निकालपत्रामध्ये दुरूस्ती करून दिनांक १०.०९.२०१६ ऐवजी दिनांक १०.०५.२०१६ अशी तारीख नमुद करून आणली आहे. त्यामुळे अर्जदारांनी प्रस्तुत अर्ज दाखल करुन अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

३. या अर्जाच्या पृष्टयार्थ अर्जदाराने त्याचे शपथपत्र निशाणी क.५ वर दाखल केले आहे, त्याचप्रमाणे कागदपत्राची यादी निशाणी क.४ खाली नियमीत दिवाणी दावा कमांक ५५०/२०१६ ची प्रमाणीत प्रत दाखल केलेली आहे. या प्रति वरून असे दिसुन येते की, बळीराम मारोतराव बोधनकर हे पुर्वी दिनांक १०.०९.२०१६ रोजी मृत्यु पावले असे घोषीत केले होते. त्यानंतर दिनांक १३.०३.२०१८ च्या मा.दिवाणी न्यायाधीश,व.स्तर नांदेड यांच्या आदेशानुसार मृत्युचा दिनांक १०.०९.२०१६ ऐवजी दिनांक १०.०५.२०१६ अशी दुरूस्ती केलेली

आहे. हयावरून हे स्पष्ट होते की, अर्जदाराच्या वडीलांचा मृत्यूचा दिनांक १०.०५.२०१६ असा आहे. त्यामुळे त्यांचे वारसा प्रमाणपत्रामध्ये हि त्यांचा मृत्यु दिनांक १०.०५.२०१६ असा असणे आवश्यक आहे. सदरची झालेली चुक हि मा.दि.न्या.व.स्तर नांदेड यांच्या आर.सी.क्रमांक ५५०/२०१६ मधील न्यायनिर्णयात चुकीने नमुद झालेल्या दिनांकामुळे झालेली आहे. त्यामुळे हि चुक दुरूस्त करणे क्रमप्राप्त ठरते आणि तशी मृत्युच्या दिनांकाची दुरूस्ती करून वारस प्रमाणपत्र अर्जदारास देणे न्यायोचीत होईल. त्यामुळे खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. आर.जे.ई.क्रमांक २४०/२०१७ मध्ये देण्यांत आलेल्या वारस प्रमाणपत्रामध्ये अर्जदाराच्या वडीलांच्या मृत्यूची तारीख दिनांक १०.०९.२०१६ ऐवजी दिनांक १०.०५.२०१६ अशी दुरूस्ती करून वारस प्रमाणपत्र अर्जदाराला दयावे.

सही/-

दिनांक : ०२/०४/२०१८.

( जे.आर.पठाण )

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, किनवट.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original Order.

Name of the Stenographer : Sachin Ashokrao Kadre,

Court name : Court of Civil Judge J.D. and Judicial Magistrate F.C., Kinwat.

Date : 02.04.2018.

Order signed by the Presiding Officer on : 02.04.2018.

Order uploaded on 02.04.2018.

…..